# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १८ व नियम १९६१ मधील नियम १७ अन्वये विभाजनाबाबतचा आदेश.

---

१८७८

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-२/महावीरट्रिकेटसहौ/विभाजन/सन २०१२

-: का र्या ल य :-

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई
कोकण भवन दुसरा मजला, नवीमुंबई-४०००६१४
दिनांक :- २०/११/२०१२

वाचावे:१) महावीर ट्रिकेट्स को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८ या संस्थेचा दि.२८/०१/२०११ रोजी सादर केलेला संस्था विभाजनाचा प्रस्ताव

२) या कार्यालयाचे मसुदा आदेश जा.क्र. मुंबई/सनि/एसवि/बी-२/महावरी ट्रि.हौ/९५८/ सन २०१२ दिनांक ०३/०५/२०१२

३) मुंबई जिल्हा गृहनिर्माण संस्था संघ मर्या. यांचेकडील दि. २५/०७/२०१२ चे विभाजनाबाबतचे शिफारस पत्र

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १८ व नियम १९६१ मधील नियम १७ मधील तरतुद

ज्याअर्थी, महावीर ट्रिकेट्स को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८ या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम ९ अन्वये करण्यात आलेली असून संस्थेचा नोंदणी क्र. एमयुएम/डब्ल्युएस/एचएसजी/टिसी/९५५९/२००७ असा असून संस्था या कार्यालयाचे वैधानिक कार्यकक्षेत कार्यरत आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेच्या अे, बी, व सी अशा तीन विंग असून अे- विंग मध्ये २८ सदनिका व बी विंग मध्ये २८ अशा एकूण ५६ सदनिका आहेत. तसेच सी विंग मध्ये ६३ सदनिका असून सी विंगची इमारत ही ११ मजली स्वतत्र इमारत असून विज, पाणि, महानगर पालिकेची बिले, प्रवेशव्दार इत्यादी स्वतत्र आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेच्या अे,बी विंग व सी विंग यांचे वरील लाईट, पाणी आणि महानगर पालिकेची बीले स्वतंत्ररित्या अदा केली जातात. आणि,

ज्याअर्थी, वरीलप्रमाणे सार्वजनिक बाबी स्वतंत्र असल्याने सदर संस्थेचे विभाजन करुन सदर संस्थेच्या सभासदांनी अे बी विंगची स्वतत्र संस्था व सी विंगची स्वतत्र संस्थेची नोंदणी व्हावी म्हणून या कार्यालयाकडे दि. ०८/०१/२०१२ रोजी अर्ज सादर केला आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील प्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि. १९/०३/२०१२ च्या पत्राने संस्थेला या कार्यालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या विभाजन प्रस्तावाची प्रत पाठवून अभिप्राय सादर करणेसाठी कळविणेत आले होते. तसेच समक्ष म्हणणे सादर करणेसाठी दि. २३/०३/२०१२, दि. ३१/०५/२०१२, दि. १४/०६/२०१२, दि.१८/०६/२०१२, दि. १६/०७/२०१२, दि. ०६/०८/२०१२ रोजी सुनावणी देण्यात आली होती. आणि,

ज्याअर्थी, सदर सुनावणी रोजी संदर संस्थेच्या ए व बि विंग च्या वतीने श्री जो. पीटर पीरीस, श्री एम. के. नेपाळी, व श्री विजयकुमार सिंग, हे उपस्थित होते व सी विंग व संस्थेच्या वतीने श्री रामानंद कोटीयन, श्री के. के. शिवशंकर, व श्री सिताराम दिक्षीत हे पदाधिकारी उपस्थित होते. अे व बी विंगच्या सभासदांनी असा आक्षेप घेतला की, सी विंग मध्ये एकूण १०८ सदनिका असून फक्त ६३ सभासद असल्याने नमुद केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, मुंबई जिल्हा गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादित मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र दि.२५/०७/२०१२ नुसार प्रकरणांची वस्तुस्थिती विचारात घेऊन संस्थेच्या विभाजनाकरीता शिफारस असल्याचे कळविले आहे. आणि,

ज्याअर्थी, वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता खालील बाबी निदर्शनास येत आहेत.

१) अे व बि विंगची स्वतत्र इमारत असून प्रत्येकी २८ प्रमाणे एकूण ५६ सदनिका धारक आहेत. व सी विंग ही सात मजला स्वतत्र इमारत असून एकूण ६३ सदनिका धारक आहेत.
२) अे, बी विंग व सी विंग इमारतीचे व्यवहार संस्था नोंदणीनंतर स्वतंत्र ठेवले जातील ते एकमेकांशी निगडीत नाहीत.
३) अे, बी विंग व सी विंग इमारतीच महानगर पालिकेच्या टॅक्सची बीले, स्वतंत्ररित्या दिली जातात.
४) अे, बी विंग व सी विंग इमारतीच लाईट, पाणी इत्यादी व्यवस्था स्वतंत्र आहे.
५) शिखर संस्था म्हणून हौसिंग फेडरेशनने विभाजनाला मान्यता दिलेली आहे.
६) अे, बी विंग मधील सभासदांनी या कार्यालयात घेण्यांत आलेल्या सुनावणी रोजी घेतलेले आक्षेप म्हणजे सी विंगचे एकूण १०८ सदनिका असून फक्त ६३ सभासद असल्याने नमुद केलेले आहे. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालीकेकडे अर्ज करुन दाद लावून घेण्यांत यावी.

ज्याअर्थी, सदर संस्थेच्या विभाजनासाठी दि ०३/०५/२०१२ रोजी मसुदा आदेश जारी करण्यात येऊन मसुदा आदेशामध्ये खालील प्रमाणे अटी राहणार असल्याचे नमुद करण्यात आले होते.

१) वरील प्रमाणे नोंदणी करण्यात येणाऱ्या दोनही गृहनिर्माण संस्था त्यांचे व्यवस्थापन स्वतंत्ररित्या पाहतील.
२) मुळ किंवा विभाजित संस्थेविरुद्ध इमारती विरुद्ध न्यायालयीन दावे चालू असल्यास त्यांचे दायित्व/जबाबदारी संबधित संस्था/इमारतीमधील सभासद संस्थेवर राहील.
३) विभाजित होणाऱ्या दोनही संस्थांचे दैनंदिन कामकाज या कार्यालयाने मंजूर केलेले उपविधी महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ नुसार चालेल.

४) दोनही संस्थांनी दिनांक ३१/०३/२०१२ चा ताळेबंद सभासद निहाय विभागून घेऊन त्याप्रमाणे मालमत्ता/दायित्व जतन करावी.

५) मुळ संस्थेचे धनको /ऋणको यांना कळविण्यात येत आहे की, त्यांनी सदर संस्थेकडे त्यांची येणी/देणी असल्यास त्यांनी एक महिन्याचे आत या कार्यालयाकडे सादर करावी.

६) दोन्ही संस्थांच्या व्यवस्थापक समितीची रचना उपविधी क्र. ११५ नुसार राहील.

७) व्यवस्थापक समिती सभेसाठी कोरम रचना उपविधी क्र. १२७ नुसार राहील.

८) मुळ संस्थेने तिच्या सभासदांना दिलेले भाग दाखले. मसुदा आदेश कायम केल्यानंतर रद्द करावेत.

९) विभाजित होणाऱ्या दोनही गृहनिर्माण संस्थांनी आदर्श उपविधी स्विकारावेत.

१०) सदरचा मसुदा आदेश कायम झाल्यावर मुळ संस्थेची नोंदणी कलम २१ नुसार रद्द झाली असे समजण्यात येईल.

११) दोनही संस्थांचा कारभार आदर्श उपविधीनुसार चालेल तसेच व्यवस्थापक समिती उपविधी ११५ नुसार राहील व तिची गणसंख्या उपविधी १२७ प्रमाणे राहील.

१२) विभाजनानंतर काही वाद निर्माण झाल्यासबाबत या कार्यालयाचा निर्णय अंतीम राहील.

१३) विभाजनानंतर निर्माण होणाऱ्या अे व बी विंग मधील ५८ सदनिका समावेश असलेली महावीर ट्रिकेटस अे व बी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. व सी विंगमधी ६३ सदनिकांचा समावेश असलेली महावीर ट्रिकेटस सी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. अशा दोन संस्थांची निर्मिती करुन त्यांचे वर्गीकरण गृहनिर्माण संस्था व उपवर्गीकरण भाडेकरु सहभागीदारी संस्था असे राहील.

१४) संस्थेने सदर मसुदा आदेशावर चर्चा करुन निर्णय घेणसाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलवावी व त्यामध्ये सदर आदेशावर चर्चा करावी.

ज्याअर्थी, मसुदा आदेशात नमुद केल्याप्रमाणे मुळ संस्थेचे धनको ऋणको यांना त्यांची मुळ संस्थेकडे येणी/देणी असल्यास त्याबाबतचे हक्क/दावे त्यांनी या कार्यालयाकडे मसुदा आदेश प्रसिध्द केल्यापासुन दोन महिन्याचे आत सादर करण्यासाठी जाहीर करण्यात आले असता कुणीही त्यांचे हक्क/दावे या कार्यालयाकडे दाखल केलेले नाहीत. तसेच मसुदा आदेशाचा दोन महिन्याचा कालावधी पुर्ण झाला असल्यामुळे विभाजनाबाबतचे आदेश कायम करणे आवश्यक असल्याने वरील बाबींना अधिम राहून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १८ व नियम १९६१ मधील १७ नियमानुसार प्राप्त झालेल्या अधिकार परत्वे मी एस. एम. मोहिते, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई, महावीर ट्रिकेट्स को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८ या संस्थेची नोंदणी कलम २१ नुसार रद्द करुन खालीलप्रमाणे दोन संस्थांची नोंदणी करीत आहे. नवीन निर्माण होणाऱ्या संस्थांचा तपशिल खालीलप्रमाणे राहील.

**संस्था क्र.१**

| | | |
|---|---|---|
| १) संस्थेचे नाव व पत्ता | :- | महावीर ट्रिकेट्स अे व बी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८ |
| २) नोंदणी क्रमांक | :- | एमयुएम/डब्लुएम/एचएसजी/टीसी/१०५३६/१२-१३/सन २०१२ दि. २०/११/२०१२ |
| ३) एकूण सभासद | :- | ५६ |
| ४) वर्गीकरण | :- | गृहनिर्माण संस्था. |
| ५) उपवर्गीकरण | :- | भाडेकरु सहभागीदार गृहनिर्माण संस्था. |
| ६) उपविधी | :- | आदर्श उपविधी |
| ७) व्यवस्थापक समिती | :- | उपविधी क्र.११५ नुसार व्यवस्थापक समिती रचना ७ सदस्यांची राहील त्यापैकी १ जागा महिला राखीव सदस्यांकरीता राहील. उपविधी क्र. १२७ नुसार कोरम ४ चे राहील. |
| ८) संस्थेची येणी देणी | :- | दि.३१/०३/२०१२ च्या सभासद निहाय विभाजित केलेल्या (सोबत जोडपत्र-१) ताळेबंदानुसार राहील. |

**संस्था क्र.२**

| | | |
|---|---|---|
| १) संस्थेचे नाव व पत्ता | :- | महावीर ट्रिकेट्स सी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८ |
| २) नोंदणी क्रमांक | :- | एमयुएम/डब्लुएम/एचएसजी/टीसी/१०५३७/१२-१३/सन २०१२ दिनांक २०/११/२०१२ |
| ३) एकूण सभासद | :- | ६३ |
| ४) वर्गीकरण | :- | गृहनिर्माण संस्था. |
| ५) उपवर्गीकरण | :- | भाडेकरु सहभागीदार गृहनिर्माण संस्था. |
| ६) उपविधी | :- | आदर्श उपविधी |
| ७) व्यवस्थापक समिती | :- | उपविधी क्र.११५ नुसार व्यवस्थापक समिती रचना ७ सदस्यांची राहील त्यापैकी १ जागा महिला राखीव सदस्यांकरीता राहील. उपविधी क्र. १२७ नुसार कोरम ४ चे राहील. |
| ८) संस्थेची येणी देणी | :- | दि.३१/०३/२०१२ च्या सभासद निहाय विभाजित केलेल्या (सोबत जोडपत्र-२) ताळेबंदानुसार राहील. |

वरील प्रत्येकाने स्वतंत्र संस्थेच्या सर्व सभासदांची सर्वसाधारण सभा १ महिन्यामध्ये बोलावून हंगामी व्यवस्थापक समितीची निवड करावी.

वरील प्रमाणे आदेश आज दि. २०/११/२०१२ रोजी प्रसिद्ध करीत आहे.

(एस. एम. मोहिते)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस विभाग,मुंबई

प्रत,

१) चेअरमन/सेक्रेटरी महावीर ट्रिकेट्स अे बी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८

२) महावीर ट्रिकेट्स सी विंग को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हुमा सिनेमा जवळ, एलबीएस मार्ग, कांजुर (पश्चिम) मुंबई-७८

३) अध्यक्ष/सचिव मुंबई जिल्हा गृहनिमार्ण संस्थाचा संघ मर्या १०३ विकास प्रिमायसेस, एन जी एन वैद्य मार्ग, फोर्ट मुंबई-४०० ००१

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर.</u>

मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२), पूर्व उपनगरे, मुंबई

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस विभाग,मुंबई